**<u>प्रेसनोट</u>** दिनांक १५/०७/२०२०

**पंचायत समिती उदगीर चे गटविकास अधिकारी वर्ग–१ अंकुश रोहीदास चव्हाण वय ३७ वर्षे व कुमदाळ ग्रामपंचायत चे ग्रामसेवक प्रल्हाद रघुनाथ सुर्यवंशी वय ५२ वर्षे, वर्ग–३ यांच्या विरोधात १००००/– रूपये लाचेची मागणी केल्या प्रकरणी गुन्हा दाखल.**

तक्रारदार यांनी दिनांक ३०/०६/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग लातुर, यांचे कडे तक्रार दिली की त्यांनी १४ व्या वित आयोगा अंतर्गत मौजे कुमदाळ ग्रमपंचायतीमध्ये केलेल्या कामाच्या बीलाच्या प्रस्तावावर सही करण्यासाठी व यापुर्वी काढलेल्या बीलाच्या दोन टक्के प्रमाणे लाचेची मागणी गट विकास अधिकारी यांनी केली आहे.

तक्रारदार यांनी वर नमुद दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०२/०७/२०२० रोजी लाचेच्या मागणी बाबत पडताळणी केली असता, गटविकास अधिकारी अंकुश रोहीदास चव्हाण यांनी तक्रारदार यांच्या वर नमुद कामासाठी पंचासमक्ष ६,०००/–रुपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम दिनांक ०३/०७/२०२० रोजी देण्यासाठी तक्रारदार गेले असता, त्यांनी सदर लाचेची रक्कम ग्रामसेवक सुर्यवंशी यांच्याकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे दिनांक ०४/०७/२०२० रोजी ११.१५ वा. गट विकास अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे ६,०००/–रुपये लाचेची रक्कम ग्रामसेवक सुर्यवशी यांना देत असताना त्यांनी आपण साहेबाना १०,०००/–रुपये देवु असे म्हणुन लाचेची मागणी केली. व संशय आल्याने ठरलेली लाचेची रक्कम घेण्याचे जाणुन बुजून टाळले.

तक्रारादार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक १५/०७/२०२० रोजी पोलीस स्टेशन उदगीर शहर गुरनं १६५/२०२० कलम ७, १२ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपास पोलीस निरीक्षक कुमार दराडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत. सदर गुन्हयातील प्रल्हाद रघूनाथ सुर्यवंशी यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणिक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, बालाजी आटरगे, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, कलवले, जाधव, मपोशि रुपाली भोसले,चापोना/राजु महाजंन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओक्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड | :– मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमारदराडेपोलीसनिरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल क्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर